पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०७**

**सभावृत्तांत**

दिनांक - **२०/०९/२०१९** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२०/०९/२०१९** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.अश्विनी भिमा बोबडे - सभापती**
२. मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे
३. मा.पवार मनिषा प्रमोद
४. मा.उषा संजोग वाघेरे(पाटील)
५. मा.काळे उषा दिलीप

या शिवाय मा.लोणकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

----------

विषय क्र.२) रूग्णालयातील औषधे / साहित्य पॅकिंगचे निरपयोगी साहित्य / हायपोसोल्युशन विक्री करणेबाबत.

----------

दिनांक **०७/०९/२०१९** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०६**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २०/०९/२०१९ विभाग – ब क्षेत्रीय कार्यालय(स्थापत्य)
सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.मनिषा पवार
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.बक्षे/स्था/कावि/०५/१४८/२०१९ दि.०९/०९/२०१९

विषय – स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत प्रभाग क्र.१७ मध्ये विविध ठिकाणी स्वच्छतागृहांची देखभाल व दुरुस्ती करणे कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**----------**

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २०/०९/२०१९ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार

सुचक : मा.उषा काळे अनुमोदक : मा.उषा वाघेरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसभां/६/कावि/१०९/२०१९ दिनांक १७/०९/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत दवाखाने /रुग्णालयास वाटप केलेले साहित्याचे पॅकिंग व औषधे पॅकिंगचे निकामी साहित्य तसेच एक्स रे विभागात उपलब्ध होणारे निकामी हायपोसोल्युशन कच-यात न जाता जसे उपलब्ध होईल त्या परीमाणाचे प्राप्त दराने लेखा विभागात रक्कम भरणा करुन त्यासह विक्री करुन मनपास आर्थिक फायदा होणार असल्याने ई-निविदा क्रमांक - ०४/२०१९-२०२०अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन दर मागविण्यात आले आहे. प्राप्त निविदाकारांमधील मनपास जास्तीत जास्त दर देवुन निकामी साहित्य विकत घेणेकामी उपलब्ध निविदाकार M/s. Trinity Enterprises यांचे दराचा तपशील खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | कामाचा तपशील | M/s. Trinity Enterprises **यांचे प्राप्त दर (GST वगळून)** | |
|---|---|---|---|
| १ | रिकाम्या काचेच्या बाटल्या ( सलाईन, इंजेक्शन, व्हायल्स ) प्रति किलो. | 2.00 | प्र.किलो |
| २ | प्लास्टि क बाटल्या व डबे (लहान /मोठे) | 12.00 | प्र.किलो |
| ३ | पुठ्याची खोकी (पुठ्ठा) | 5.75 | प्र.किलो |
| ४ | पत्र्याचे डबे (लहान /मोठे) | 11.00 | प्र.किलो |
| ५ | लाकडी खोकी | 1.25 | प्र.किलो |
| ६ | १ लिटरचे प्लास्टिक जार | 20.00 | प्र.किलो |
| ७ | ५ लिटरचे प्लास्टिक जार | 24.00 | प्र.किलो |
| ८ | मनपाचे सर्व रुग्णालयाकडील उपलब्ध होणारे हायपोसोल्युशन | 38.00 | प्र.लिटर |
| ९ | थर्माकॉल बॉक्स | 1.50 | प्र.किलो |
| १० | खराब क्ष- किरण फिल्म्स | 30.00 | प्र.किलो |

महानगरपालिकेच्या दवाखाने /रुग्णालयाकडील निकामी साहित्य व हायपोसोल्युशन वारंवार उपलब्ध होत असल्याने त्याची प्राप्त दवाखाने /रूग्णालयातुन विक्री करुन मनपास आर्थिक फायदा होणार आहे. त्याअनुषंगाने M/s. Trinity Enterprises यांचे प्राप्त दर मा. आयुक्त सो यांनी दिनांक - /०९/२०१९ चे प्रस्तावान्वये स्विकृत केलेले आहेत. सबब मनपाचे दवाखाने/रुग्णालयातील निकामी पुठ्ठे, काचेच्या बाटल्या, प्लास्टीक जार , व लोखंडी साहित्य तसेच निकामी हायपोसोल्युशन निविदेतील उच्चतम प्राप्त दर अधिकGST याप्रमाणे M/s. Trinity Enterprisesयांना दोन वर्षासाठी देण्यात येणारे कामकाजाची अंदाजे एकत्रित रक्कम रुपये ५,०२,२०६/- इतकी येत आहे. ही किंमत र.रु. ५००/- पेक्षा जास्त असल्याने त्या साहित्याची विक्री करणेसाठी मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(अश्विनी भिमा बोबडे)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४३४/२०१९
दिनांक : २०/०९/२०१९



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.